**प्रेस नोट** **दिनांक १०/०७/२०१९**

## चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## गणपती मंडळाची बैठकीचे आयोजन केलेबाबत

दि. १०/०७/२०१९ रोजी चंदननगर पो.स्टे. हद्दीत सकाळी १०/०० ते ११/४५ वा. च्या दरम्यान चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर या ठिकाणी गणेश उत्सवा निम्मीत चंदननगर पोलीस स्टेशन हददीतील गणेश मंडळांचे पदाधिकारी यांची बैठकी आयोजन करण्यात आले होते. सदरची बैठक पोलीस उप आयुक्त श्री. अक्कानवरू साो यांचे अध्यक्षतेखाली घेतली असुन मिटींगसाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक – कृष्णा इंदलकर, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. सत्यवान पाटील, गोपनिय विभागाचे पो.हवा. हरीदास कदम, पोशि. पांडुरंग नाणेकर असा स्टाफ हजर होता. सदर बैठकीमध्ये मा. पोलीस उप आयुक्त श्री अक्कानवरू यांनी आपल्या मनोगतामध्ये गणेशोत्सवाची पुर्वतयारी, गणेश उत्सव मध्ये येणा-या अडचणी, चांगले उपक्रम, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये. याबाबत गणपती मंडळाना मार्गदर्शन करुन कोणतीही अडचण असल्यास लागलीच पोलीसांशी संपर्क करण्याचे आव्हान केले. तसेच मंडळाचे स्टेज समोरील रोडवर उच्च प्रतिचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, डीव्हीआरमध्ये त्याचे फुटेज राहील याची दक्षता घेणे, मंडपाजवळ दिवसा व रात्रौ सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षकाची नेमणुक करावी, ध्वनीक्षेपनाच्या मर्यादेबाबत, डीजे डॉल्बीचा वापर करु नयेबाबत, वाहतुकीस अडथळा होईल अशी पध्दतीने स्टेज न लावणेबाबत, मिरवणुकीमध्ये कार्यकर्ते व स्वयंसेवक यांनी समन्वय ठेवणेबाबत सुचना दिल्या. तसेच चंदननगर पोलीस स्टेशन फोन नंबर ०२०-२७०१२३२१ वर किंवा १०० नंबर वर संपर्क करण्याचे आव्हान करण्यात आले. सदर बैठकीमध्ये मंडळांचे पदाधिकारी यांनी मनोगते व्यक्त केली. सदर बैठकीसाठी १०० ते १२५ गणेश मंडळाचे पदाधिकारी हजर होते.

